जनहित याचिका क्र. २८/२०१३ व इतर संकीर्ण याचिका प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये गठीत केलेल्या एकसदस्यीय समितीचा अहवाल व शिफारशी स्विकृत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः एमव्हीडी-१२१७/प्र.क्र.३२४/परि-४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : ३ मे २०१९

वाचा :- १) शासन निर्णय समक्रमांक दि.५.१.२०१८.
२) श्री. राजगोपाल देवरा समितीचे दि.२७.९.२०१८ रोजीचे पत्र.

प्रस्तावना -

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. २८/२०१३ सोबत संकीर्ण याचिका क्र. २५३०८/२०१७, ३०३०५/२०१७, ३०४५६/२०१७, १०९/२०१७ तसेच ११०/२०१७ मधील दि.१७.११.२०१७ रोजीचे आदेशानुसार, राज्यातील मोटार वाहन विभागातील परिवहन वाहनांना योग्यता प्रमाणपत्र देणे विषयी झालेल्या अनियमिततेची सखोल तपासणी करण्याकरीता संदर्भाधीन क्र. १ वरील दि.५.१.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये श्री. राजगोपाल देवरा, तत्कालीन मुख्य राज्यशिष्टाचार अधिकारी तथा प्रधानसचिव यांची एक सदस्यीय समिती गठीत केली होती. प्रस्तुत समितीने त्यांचा अहवाल संदर्भाधीन क्र. २ वरील दि.२७.९.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला होता. प्रस्तुत समितीच्या शिफारशींपैकी क्र. ४.८ वरील शिफारसबाबत शासनाने केलेला C. A. मा. उच्च न्यायालयाने यापूर्वीचे Reject केलेला असल्याने उर्वरीत शिफारशी स्वीकृत करुन त्यांची अंमलबजावणी करणेची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक-

श्री. राजगोपाल देवरा यांच्या एक सदस्यीय समितीने त्यांचे अहवालाद्वारे केलेल्या शिफारशी विचारात घेवून त्यामधील शिफारस क्र. ४.८ वगळता उर्वरीत सर्व शिफारशी शासनाने स्वीकृत केल्या आहेत. प्रस्तुत शिफारशींच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:-

१) मोटार वाहन विभागाचे आधुनिकीकरणांतर्गत रस्ता सुरक्षेची खात्री आणि योग्यता प्रमाणपत्र तपासणी योग्य पध्दतीने होण्यासाठी ब्रेक परीक्षक, वायु प्रदुषण परीक्षक, हेड लाईट बीम विश्लेषक यासारखी अत्याधुनिक मोटार तपासणी उपकरणे आणि इतर उपकरणे वापरण्यात यावीत.

२) मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम ५६ (२) सोबत केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ मधील नियम ६३ ते ६९ नुसार खाजगी क्षेत्रातील सहभागाने कालबध्द कार्यक्रम राबवुन आधुनिक आणि सर्व साहित्यांनी सुसज्ज असे खाजगी तपासणी केंद्र स्थापन करण्यासाठी पथदर्शी कार्यक्रम आखण्यात यावा. त्याद्वारे मोटार वाहन कायदा १९८८ आणि त्यानुषंगीक नियमांचे पालन होते किंवा नाही यासाठी अशा केंद्राचे निरीक्षण मोटार वाहन विभागामार्फत करण्यात यावे.

३) कायदयांतील तरतुदींधारे आणि नियमभंग करुन चुकीचे काम करणाऱ्या अधिकारी आणि त्याचे पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमांतर्गत शिस्तभंगाची कारवाई प्राधान्याने करण्यात यावी.

४) वाहन ४.० या प्रणालीचा विकास आणि उन्नतीकरण करणेसाठी प्राधान्याने पाठपुरावा करावा.

५) योग्यता प्रमाणपत्र तपासणीचे कामावर प्रत्यक्ष देखरेख ठेवण्यासाठी निरीक्षण कृतीचे व्हिडीओ चित्रण थेट सामायिकरण (Live sharing) प्रक्रीयेद्वारे संबंधित जिल्हयाचे प्रादेशिक परिवहन अधिकारी/उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आणि त्यांचे पर्यवेक्षण करणाऱ्या परिवहन आयुक्त कार्यालयातील वरीष्ठ अधिकाऱ्यांना उपलब्ध करणेबाबत कार्यवाही करावी. या कार्यवाहीसाठी अावश्यकता असल्यास मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

६) निरीक्षण केंद्रावर वाहनांची गर्दी टाळण्यासाठी विहीत दिनांकास निश्चित वेळ देण्यात यावा.

७) मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम ५६ (२) नुसार खाजगी संस्थांच्या भागीदारीद्वारे नमूना टेस्ट ट्रॅकची उभारणी करण्यासाठी तेथील वाहन संख्या आणि फी संरचना विचारात घेवून आर्थिक व्यवहार्यता तपासण्यात यावी.

८) योग्यता तपासणी दिनांकापूर्वी फी वसूल करणे आणि फी अदा न करता नियुक्ती दिनांक मिळणे टाळण्यासाठी वाहन ४.० प्रणालीमध्ये आवश्यक ते फेरबदल करण्यात यावेत.

९) ना हरकत प्रमाणपत्र हे विहीत केल्यानुसार वरीष्ठ अधिकाऱ्यांमार्फत आदर्श कार्यपध्दतीने हाताळली जावी. तसेच वाहन तपासणी संदर्भात मुळ विभागाकडील समकक्ष आदर्श सुविधा असल्याप्रमाणेच ना-हरकत प्रमाणपत्रे प्राप्त करणाऱ्या कार्यालयांकडे/राज्यांकडे सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे.

१०) वाहन ४.० या प्रणालीस रोबोस्ट कनेक्टिव्हीटी जोडण्यात यावी. त्याद्वारे ऑनलाईन मोडवर संबंधित अधिकारी यांनी प्रत्यक्ष कामावर देखरेख ठेवणे आवश्यक आहे.

११) ब्रेक टेस्ट ट्रॅकवर शासनाचा मोठया प्रमाणात निधी खर्च होत असल्यामुळे मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम ५२ (६) अंतर्गत योग्यता प्रमाणपत्रांचे नविनीकरण करणेसाठी खाजगी टेस्ट ट्रॅक वर तपासणी आयोजित करावी. यासाठी कालमर्यादित कार्यक्रम आखुन टेस्ट ट्रॅकची उभारणी करावी.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०५०३१५५५२५१४६२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशा नुसार व नावाने,

KADAM
DATTATRAY
HANMANT

Digitally signed by KADAM DATTATRAY HANMANT
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=cf316337e92d3c54da432222208093bfc6ed1d1570f094663515273d0b4d27fc, postalCode=400032,
street=HOME DEP.MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=a923979cf886d5724fbed87cd57745c3f72eba57b0d277f11e970f0aaca99802, ou=NA,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KADAM DATTATRAY HANMANT
Date: 2019.05.03 16:02:30 +05'30'

(द.ह.कदम)
अवर सचिव, गृह (परिवहन) विभाग

प्रत,

१) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) अपर/सह परिवहन आयुक्त, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई
३) परिवहन उप आयुक्त (प्रशासन/संगणक/ लेखा/निरीक्षण/अंमल), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.
४) सर्व प्रादेशिक/उपप्रादेशिक परिवहन अधिकारी. (परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत)
५) निवड नस्ती, परि-४.